॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 20 — VIMSHATITAMODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Chapter 20 opens with Hanuman keeping his promise, going ahead to Shringamurad and secretly visiting Queen Mainakini to warn her that the invincible Gorakshanath is coming to rescue his master, Machindranath, advising her to welcome him with grand honors. The narrative then reveals Mainakini's backstory: cursed by her father for laughing at the husbandless Kingdom of Women, she was reborn there, sheltered by a leatherworker, and later chosen as queen via a royal elephant-and-garland rite—unifying her three names: Mainakini, Padmini, and Kilotala.

In the present, the courtesan Kalinga performs at court, accompanied by Gorakshanath disguised as a female drummer. By weaving his own name into the rhythm, Gorakshanath deeply unsettles an anxious Machindranath. Recognizing his raw power, the Queen unmasks Gorakshanath in private, dresses him as a prince, and presents him to the court. The chapter ends with a deeply emotional reunion between master and disciple as they dine and sit together with young Meenanath on the royal throne.

Ovee 1

जयजयाजी पंढरीराया । भोक्तया षड्गुणऐश्वर्या । ऐसी सोसूनि अपार माया । सकळ कळा तुझेनि ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Pandharee-raayaa | Bhoktayaa shad-guna-aishvaryaa | Aisee sosuni apaara maayaa | Sakala kalaa tujheni ||

Ovee 2

घट-पट तंतु आकाशन्याय । सर्व तंवचि ब्रह्म होय । ऐसें असूनि निराळा राहे । अव्यक्त व्यक्ती पावुनी ॥

Transliteration

Ghata Pata-tantu aakaasha-nyaayu | Sarva tavachi Brahma hoyu | Aise asuni niraalaa raahe | Avyakta vyaktee paavunee ||

Ovee 3

कीं अपार घटीं अपार तरणी । व्यापूनि ऐक्य दिसे गगनीं । त्याचि न्यायें मोक्षदानी । व्याप्त असे सर्वांतें ॥

Transliteration

Kee apaara ghatee apaara taranee | Vyaapuni aikya dise gaganee | Tyaachi nyaaye moksha-daanee | Vyaapta ase sarvaante ||

Ovee 4

तरी पूर्णब्रह्म नाथवेष । करुणानिधी पंढरीचा अधीश । माय कनवाळू जगन्निवास । भक्तवत्सल नटलासे ॥

Transliteration

Taree poorna-Brahma naatha-veshu | Karunaa-nidhee pandhareechaa adheeshu | Maya kanavaaloo jagan-nivaasu | Bhakta-vatsala natalaase ||

Ovee 5

तरी हे दीनबंधो भक्तव्यापका । पुंडलीक वरदायका । आतां पुढें रसना दोंदिका । भक्तिसार वदवीं कां ॥

Transliteration

Taree hey deena-bandho bhakta-vyaapakaa | Pundaleeka varadaayakaa | Aataa pudhe rasanaa dondikaa | Bhakti-saara vadavee kaa ||

Ovee 6

मागिले अध्यायीं रामदर्शन । आणि द्वितीय अंजनीनंदन । गोरक्षालागीं भेटून । अदृश्यपणीं मिरवले ॥

Transliteration

Maagile adhyaayee Raama-darshanu | Aani dviteeya Anjanee-nandanu | Gorakshaa-laagee bhetunu | Adrishya-pane miravale ||

Ovee 7

असो स्वस्थाना गेला अयोध्यानाथ । येरीकडे अंजनीसुत । श्रृंगमुरडा जाऊनि त्वरित । सानवेषें नटलासे ॥

Transliteration

Aso sva-sthaanaa gelaa Ayodhyaa-Naathu | Yereekade Anjanee-sutu | Shringa-muradaa jauni tvaritu | Saanaveshe natalaase ||

Ovee 8

गुप्तवेषें राजसदन । पाहता झाला अंजनीनंदन । एकांतसदनीं मैनाकिनी पद्मिण । मंचकावरी पहुडली ॥

Transliteration

Guptaveshe raaja-sadanu | Paahataa jhaalaa Anjanee-nandanu | Ekaanta-sadanee Mainaakinee Padminee | Manchakaa-varee pahudalee ||

Ovee 9

सुखनिद्रा शयनी असून । परिचारिका गेल्या उठोन । ऐसी एकान्त संधी पाहून । धवळारीं तैं संचारला ॥

Transliteration

Sukha-nidraa shayanee asunu | Parichaarikaa gelyaa uthonu | Aisee ekaanta sandhee pahunu | Dhavalaaree tai sanchaaralaa ||

Ovee 10

चपळपणीं तो मंचकाजवळी । जाऊन बैसला प्रतापबळी । कीलोतळा पद्मिनी कमळी । करपात्रीं धरियेली ॥

Transliteration

Chapalapanee toh manchakaa-javalee | Jaauna baisalaa prataapa-balee | Keelotalaa Padminee kamalee | Kara-paatree dhariyelee ||

Ovee 11

व्यक्त होत करकमळ । सावध झाली कीलोतळा वेल्हाळ । तों दृष्टीं देखिला अंजनीबाळ । चरणांवरी लोटली ॥

Transliteration

Vyakta hota kara-kamalu | Saavadha jhaalee Keelotalaa velhaalu | Toh drishtee dekhilaa Anjanee-baalu | Charanaa-varee lotalee ||

Ovee 12

कीलोतळा आणि मैनाकिनी । तृतीय नाम जिये पद्मिनी । यापरी बोलती कल्पनीं । कवणें अर्थी हीं नामें ॥

Transliteration

Keelotalaa aani Mainaakinee | Triteeya naama jiye Padminee | Yaaparee shrotee bolatee kalpanee | Kavane arthee hee naame ||

Ovee 13

तृतीय अभिधाना ती दुहिता । झाली कवणा अर्था । मग त्या कल्पनीं वाक्सरिता । व्यक्ती घेणें मिरवली ॥

Transliteration

Triteeya abhidhaanaa tee duhitaa | Jhaalee kavanaa arthaa | Maga tyaa kalpanee vaak-saritaa | Vyaktee ghene miravalee ||

Ovee 14

ऐसा पाहुनि श्रोतियां आदर । बोलता झाला कवि सादर । तृतीय भिन्न भिन्न प्रकार । कैशा रीतीं एका त्या ॥

Transliteration

Aisaa paahuni shrotiyaa aadaru | Bolataa kavi saadaru | Triteeya bhinna bhinna prakaaru | Kaishaa reetee ekaa tyaa ||

Ovee 15

तरी पर्वतांमाजी मंदरगिरी । जंबुद्वीप त्याची प्रथम पायरी । यापरी सिंहलद्वीपाची दुसरी । मेरुमंदार आहे कीं ॥

Transliteration

Taree parvataam-maajee Mandara-giree | Jambu-dveepa tyaachee prathama paayaree | Yaaparee Sinhala-dveepaachee dusaree | Meru-mandaara aahe kee ||

Ovee 16

यापरी सिंहलद्वीपभुवनीं । स्त्रिया जितुक्या असती पद्मिनी । त्यांत ही मुख्य मैनाकिनी । स्वरुपवंती मिरवतसे ॥

Transliteration

Yaaparee Sinhala-dveepa-bhuvanee | Striyaa jitukyaa asatee Padminee | Tyaanta hee mukhya Mainaakinee | Svarupa-vantee miravatase ||

Ovee 17

तों एकें दिवशीं अभ्यंग करुनी । उभी राहिली धवळारी जाऊनि । ते सहज दृष्टीं दिशागमनीं । आकाशातें पाहातसे ॥

Transliteration

Toh eke divashee abhyanga karunee | Ubhee raahilee dhavalaaree jauni | Tey sahaja drishtee disha-gamanee | Aakaashaate paahaatase ||

Ovee 18

हस्तीं झगडतीं कबरीभार । तो वर दृष्टी जाऊनी गोचर । उपरिचरवसु विमानावर । आरुढ होऊनि जातसे ॥

Transliteration

Hastee jhagadatee kabaree-bhaaru | Toh vara drishtee jaauunee gocharu | Uparichara-vasu vimaanaa-varu | Aarudha houni jaatase ||

Ovee 19

विमानारुढ झाला होता । तों वसन एकांगें झालें तत्त्वतां । आवेशें बाहेर लिंग दर्शता । असावध बैसलासे ॥

Transliteration

Vimaana-arudha jhaalaa hotaa | Toh vasana ekaange jhaale tattvataa | Aaveshe baahera linga darshataa | Asaavadha baisalaase ||

Ovee 20

विमानावरी गवाक्षद्वार । त्यांतूनि दिसे अवयव समग्र । तों मैनाकिनी पाहूनि नेत्रें । हांसे खदखदां ते काळीं ॥

Transliteration

Vimaanaa-varee gavaaksha-dvaaru | Tyaantuni dise avayava samagru | Toh Mainaakinee pahuni netre | Haanse khada-khadaa tey kaalee ||

Ovee 21

तें ऐकूनि वसुनाथ । विक्षेपोनी बोलता झाला तीतें । म्हणे पापिणी परपुरुषांते । पाहूनियां हांसलीस ॥

Transliteration

Tey aikuni Vasunaathu | Viksheponee bolataa jhaalaa teete | Mhane paapinee para-purushaante | Paahuniyaa haansaleesu ||

Ovee 22

तरी ऐसी जारिणी वरती । धरुनि राहसी स्वगृहाप्रती । माझेविषयीं कामशक्ती । उद्भवली म्हणूनि हांसलीस ॥

Transliteration

Taree aisee jaarinee varatee | Dharuni raahasee sva-grihaapratee | Maajhe-vishayee kaama-shaktee | Udbhavalee mhanuni haansaleesu ||

Ovee 23

तरी मी नोहे तैसा भ्रष्ट । सकळ वसूंमाजी श्रेष्ठ । इंद्रियदमनीं एकनिष्ठ । पूर्णतपा साधीतसें ॥

Transliteration

Taree mee nohe taisaa bhrashtu | Sakala vasoom-maajee shreshthu | Indriya-damanee eka-nishthu | Poorna-tapaa saadheetase ||

Ovee 24

तरी मम अभिलाष धरुनी । गदगदां हांससी पापिणी । तरी पुरुषविनोदें स्वस्थानीं । जाऊनियां पडशील ॥

Transliteration

Taree mama abhilaasha dharunee | Gada-gadaa haansasee paapinee | Taree purusha-vinode svasthaanee | Jauniyaa padasheelu ||

Ovee 25

स्त्रीदेशांत स्त्रीकटकीं । वस्ती होईल तुझी शेखीं । मग कैंचा पुरुष ते लोकीं । दृष्टीगोचर होईल ॥

Transliteration

Stree-deshaanta stree-katakee | Vastee hoeela tujhee shekhee | Maga kainchaa purusha tey lokee | Drishti-gochara hoeelu ||

Ovee 26

ऐसें बोलतां वसु अंतरिक्ष । परम लाजली पद्मिनी सुलक्ष । परी पदच्युत शब्द ऐकतां प्रत्यक्ष । स्तुतिसंवादा व्यापिली ॥

Transliteration

Aise bolataa Vasu antarikshu | Parama laajalee Padminee sulakshu | Paree pada-chyuta shabda aikataa pratyakshu | Stuti-samvaadaa vyaapilee ||

Ovee 27

म्हणे महाराजा वसुनाथा । अपराध झाला विषम आतां । अपराधाचें विवरण करितां । बोलतां न ये आम्हांसी ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa Vasunaathaa | Aparaadha jhaalaa vishama aataa | Aparaadhaache vivarana karitaa | Bolataa na ye aamhaansee ||

Ovee 28

परी हा असो प्रारब्धयोग । कदा न सुटे आचरला भोग । तरी उश्शाप देऊनि आतां चांग । स्वपदातें स्थापावें ॥

Transliteration

Paree haa aso praarabdha-yogu | Kadaa na sute aacharalaa bhogu | Taree ushshaapa deuni aataa chaangu | Sva-padaate sthaapaave ||

Ovee 29

तुम्ही वसु सर्वप्रकारें । भरलां आहां शांतिभांडारें । परम कनवाळू इंद्रियें साचारें । योगदमनीं मिरवला ॥

Transliteration

Tumhee Vasu sarva-prakaare | Bharalaa aahaa shaanti-bhaandaare | Parama kanavaaloo indriye saachaare | Yoga-damanee miravalaa ||

Ovee 30

तरी उश्शाप देऊनि मातें । करीं महाराजा पदाश्रित । मग अंतरिक्ष पाहूनि ढळाळित । उश्शापातें वदलासे ॥

Transliteration

Taree ushshaapa deuni maate | Karee Mahaaraajaa padaashritu | Maga Antariksha pahuni dhalaalitu | Ushshaapaate vadalaase ||

Ovee 31

म्हणे पद्मिनी ऐक वचन । स्त्रीराज्यांत कीलोतळा स्वामीण । तेथें आयुष्य सरल्या पूर्ण । तैं पदीं वसेल तूं माये ॥

Transliteration

Mhane Padminee aika vachanu | Stree-raajyaanta Keelotalaa svaameenu | Tethe aayushya saralyaa poornu | Tai padee vasaseela too maaye ||

Ovee 32

परी मज भावें निवेदिलें चित्त । तरी महीं मिरवेल माझा सुत । तो तुज स्वीकारुनि होईल रत । मच्छिंद्रनाथ म्हणोनियां ॥

Transliteration

Paree maja bhaave nivedile chittu | Taree mahee miravela maajhaa sutu | Toh tuja sveekaaruni hoeela ratu | Machchindra-Naatha mhanoni-yaa ||

Ovee 33

तो रत झालिया अंगसंगीं । पुत्र लाभसील रेतप्रसंगीं । मीननाथ हें नाम जगीं । प्रसिद्ध मिरवेल महीतें ॥

Transliteration

Toh rata jhaaliyaa anga-sangee | Putra laabhaseela reta-prasangee | Meena-Naatha hey naama jagee | Prasiddha miravela maheete ||

Ovee 34

तो पुत्र झालिया तूतें शेवटीं । विभक्त होईल मच्छिंद्रजेठी । मग तूं स्वपदा येऊनि गोरटी । भोग भोगीं स्वर्गींचा ॥

Transliteration

Toh putra jhaaliyaa toote shevatee | Vibhakta hoeela Machchindra-jethee | Maga too sva-padaa yeuni goratee | Bhoga bhogee svargeenchaa ||

Ovee 35

याउपरी बोलली मैनाकिनी । पुरुष नाहीं कां तयां भुवनीं । सकळ स्त्रिया दिसती अवनीं । काय म्हणोनी महाराजा ॥

Transliteration

Yaauparee bolalee Mainaakinee | Purusha naahee kaa tayaa bhuvanee | Sakala striyaa disatee avanee | Kaaya mhanonee Mahaaraajaa ||

Ovee 36

तरी पुरुषांवांचूनि संतती । कोठूनि होतसे नसूनि पती । येरुं म्हणे येऊनि मारुती । भुभुःकार देतसे ॥

Transliteration

Taree purushaavaan-chuni santatee | Kothuni hotase nasuni patee | Yeru mhane yeuni Maarutee | Bhubhuh-kaara detase ||

Ovee 37

उर्ध्वरेता वायुनंदन । वीर्य व्यापीतसे भुभुःकारेंकरुन । मग उत्पत्ति उदयजन्म । तेथें होतसे शुभानने ॥

Transliteration

Urdhva-retaa Vaayu-nandanu | Veerya vyaapeetase bhubhuh-kaaren-karunu | Maga utpatti udaya-janmu | Tethe hotase shubhaanane ||

Ovee 38

बाळतनु जो पुरुषधारी । मृत्यु पावे तो भुभुःकारीं । तितुक्यांविण अचळ नारी । महीवरी विराजती ॥

Transliteration

Baala-tanu jo purusha-dhaaree | Mrityu paave toh bhubhuh-kaaree | Titukyaavina achala naaree | Maheevaree viraajatee ||

Ovee 39

ऐसी वदतां अंतरिक्ष मात । मग बोले पद्मिनी त्यासी त्वरित । हे महाराजा मच्छिंद्रनाथ । येईल कैसा त्या ठाया ॥

Transliteration

Aisee vadataa Antariksha maatu | Maga bole Padminee tyaasee tvaritu | Hey Mahaaraajaa Machchindra-Naathu | Yaeela kaisaa tyaa thaayaa ||

Ovee 40

प्रत्यक्ष पुरुष पावती मरण । ऐसी चर्चा तेथें असून । कैसा येईल तव नंदन । मम भोगार्थ महाराजा ॥

Transliteration

Pratyaksha purusha paavatee maranu | Aisee charchaa tethe asunu | Kaisaa yaeela tava nandanu | Mama bhoga-artha Mahaaraajaa ||

Ovee 41

अंतरिक्ष म्हणे वो शुभाननी । तूं कीलोतळेचें उपरी जाऊनी । बैसोनि उपरी तपमांडणीं । आराधावा मारुती ॥

Transliteration

Antariksha mhane vo shubha-aananee | Too Keelotaleche uparee jaauunee | Baisoni uparee tapa-maandanee | Aaraadhaavaa Maarutee ||

Ovee 42

प्रसन्न झालिया वायुनंदन । मग मुक्ती करील त्या भयापासून । परी तुज सांगतों ती खूण । चित्तामाजी रक्षावी ॥

Transliteration

Prasanna jhaaliyaa Vaayu-nandanu | Maga muktee kareela tyaa bhayaa-paasunu | Paree tuja saangato tee khoonu | Chittaa-maajee rakshaavee ||

Ovee 43

प्रसन्न होईल जेव्हां मारुती । मागणें करिजे अंगसंगती । मग तो संकटीं पडूनि क्षिती । मच्छिंद्रातें आणील ॥

Transliteration

Prasanna hoeela jevhaa Maarutee | Maagane karije anga-sangatee | Maga toh sankatee paduni kshitee | Machchindraate aaneelu ||

Ovee 44

तरी हा रचूनि दृढतर उपाय । मिरवत आहे मारुती भय । तरी तयाचे हस्तें साधावें कार्य । मच्छिंद्रातें आणोनी ॥

Transliteration

Taree haa rachuni dridha-tara upaayu | Miravata aahe Maarutee bhayu | Taree tayaache haste saadhaave kaaryu | Machchindraate aanonee ||

Ovee 45

याउपरी बोले पद्मिनी युवती । रामचरणीं श्रीमारुती । कैसें सांग मातें द्यावी रती । ऐसे म्हणेल महाराजा ॥

Transliteration

Yaauparee bole Padminee yuvatee | Raama-charanee Shree-Maarutee | Kaise maate dyaavee ratee | Aise mhanela Mahaaraajaa ||

Ovee 46

परी ऐसिये बोलप्रकरणीं । मारुतीच मिरवला विषयध्वनी । मग तव सुत मच्छिंद्र कोठूनि । तेथें येईल महाराजा ॥

Transliteration

Paree aisiye bola-prakaranee | Maaruteecha miravalaa vishaya-dhvanee | Maga tava suta Machchindra kothuni | Tethe yaeela Mahaaraajaa ||

Ovee 47

ऐसें अंतरिक्ष ऐकतां वचन । म्हणे विषयोपद्रवरहित वायुनंदन । ब्रह्मचर्य व्रतातें लोटून । रतिसुखा कैसा मिरवेल ॥

Transliteration

Aise Antariksha aikataa vachanu | Mhane vishaya-upadrava-rahita Vaayu-nandanu | Brahmacharya vrataate lotunu | Rati-sukhaate miravelu ||

Ovee 48

तरी हा संशय सोडूनि गोरटी । अर्थ धरिजे इतुका पोटीं । मच्छिंद्रा लाहसील येणें कोटीं । हनुमंतेंकरुनियां ॥

Transliteration

Taree haa sanshaya soduni goratee | Artha dharije itukaa potee | Machchindraa laahaseela yene kotee | Hanumanten-karuniyaa ||

Ovee 49

ऐसें सांगूनियां अंतरिक्ष । स्वस्थाना गेला वसु दक्ष । येरीकडे मैनाकिनी प्रत्यक्ष । स्त्रीराज्यांत प्रवर्तली ॥

Transliteration

Aise sanguni-yaa antarikshu | Sva-sthaanaa gelaa Vasu Dakshu | Yereekade Mainaakinee pratyakshu | Stree-raajyaanta pravartalee ||

Ovee 50

श्रृंगमुरडा राजपट्टणीं । भ्रमण करितां ती पद्मिणी । तों चर्मिकेचे सदनीं । सहजस्थितीं पातली ॥

Transliteration

Shrringa-muradaa raaja-pattanee | Bhramana karitaa tee Padminee | Toh tey charmikeche sadanee | Sahaja-sthitee paatalee ||

Ovee 51

सहजस्थितीं जाऊनि ओसरीं । बैसती झाली शुभगात्री । तों ती चर्मिका पाहूनि नेत्रीं । बोलती झाली तियेतें ॥

Transliteration

Sahaja-sthitee jauni osaree | Baisatee jhaalee shubhagaatree | Toh tee charmikaa pahuni netree | Bolatee jhaalee tiyete ||

Ovee 52

म्हणे माय वो शुभाननी । कोठें अससी लावण्यखाणी । येरी म्हणे वो मायबहिणी । सिंहलद्वीपीं मी असतें ॥

Transliteration

Mhane maaya vo shubha-aananee | Kothe asasee laavanya-khaanee | Yeree mhane vo maaya-bahinee | Sinhala-dveepee mee asate ||

Ovee 53

परी अंतरिक्षवसूचे शापेंकरुन । पाहतें झालें माय हें भुवन । आतां माझे संगोपन । कोणी करील कळेना ॥

Transliteration

Paree Antariksha-vasoo-che shaapen-karunu | Paahate jhaale maaya hey bhuvanu | Aataa maajhe sangopanu | Konee kareela kalenaa ||

Ovee 54

ऐसी ऐकूनि पद्मिनी वाणी । बोलती झाली तों चर्मिणी । म्हणे माय वो माझे स्थानीं । राहुनि सुख भोगीं कां ॥

Transliteration

Aisee aikuni Padminee vaanee | Bolatee jhaalee tee charminee | Mhane maaya vo maajhe sthaanee | Rauhuni sukha bhogee kaa ||

Ovee 55

स्वहस्तें करुनि पाक । हरीत जा माये तृषाभूक । मी आपुल्या गृहींची एक । तारंबळ होतसे ॥

Transliteration

Sva-haste karuni paaku | Hareeta jaa maaye trishaa-bhooku | Mee aapulyaa griheenchee eku | Taarambala hotase ||

Ovee 56

तरी माय वो उपेक्षा सोडून । सेवीं माय वो माझें सदन । कन्येसमान तुज पाळीन । सर्व सुख देऊनियां ॥

Transliteration

Taree maaya vo upekshaa sodunu | Sevee maaya vo maajhe sadanu | Kanye-samaana tuja paaleenu | Sarva sukha deuniyaa ||

Ovee 57

ऐसी ऐकूनी तियेची वार्ता । परम तोषली हृदयीं दुहिता । मग तेथेंचि राहूनि वल्लवी हस्ता । क्रियेलागीं आराधी ॥

Transliteration

Aisee aikuunee tiyechee vaartaa | Parama toshalee hridayee duhitaa | Maga tey tohchee rahuni vallavee hastaa | Kriyelaagee aaraadhee ||

Ovee 58

स्वहस्तें करुनि पाकनिष्पत्ती । हरीत चर्मिकेचे क्षुधेप्रती । शेवटीं भोजनक्रियेसंगतीं । आपण सेवी नित्यशा ॥

Transliteration

Sva-haste karuni paaka-nishpattee | Hareeta charmikeche kshudhe-pratee | Shevatee bhojana-kriye-sangatee | Aapana sevee nityashaa ||

Ovee 59

यासही लोटतां बहुत दिन । कीलोतळा राज्यस्वामीण । आयुष्य सरलें जरा व्यापून । मग मंत्र्यालागीं बोलतसे ॥

Transliteration

Yaasahee lotataa bahuta dinu | Keelotalaa raajya-svaameenu | Aayushya sarale jaraa vyaapunu | Mag mantryaalaagee bolatase ||

Ovee 60

म्हणे आयुष्य सरलें निकट । तरी कोणासी हो द्यावा राज्यपट । मंत्री म्हणे माळिका चोखट । गजशुंडीं विराजमान ॥

Transliteration

Mhane aayushya sarale nikatu | Taree konaasee ho dyaavaa raajyapatu | Mantree mhane maalikaa chokhatu | Gaja-shundee viraajavaavee ||

Ovee 61

सकळ स्त्रिया पाचारुन । गज प्रेरावा माळ देऊन । त्यासी भेटेल दैववान । माळग्रहणीं ग्रीवेंत ॥

Transliteration

Sakala striyaa paachaarunu | Gaja preraavaa maala deunu | Tyaasee bhetela daiva-vaanu | Maala-grahanee greeventu ||

Ovee 62

ऐसें बोलत मंत्री तये वेळा । परम तोषली कीलोतळा । सुदिन पाहूनि कार्यमंगळा । अर्पिली माळा गजशुंडी ॥

Transliteration

Aise bolata mantree taye velaa | Parama toshalee Keelotalaa | Maga sudina pahuni kaarya-mangalaa | Arpilee maalaa gajashundee ||

Ovee 63

समग्र स्त्रियांची सभा करुन । मग तो प्रेरिला माळ देऊन । ते प्रांती मैनाकिनी पाहून । माळ ग्रीवेंत ओपिली ॥

Transliteration

Samagra striyaanchee sabhaa karunu | Maga toh prerilaa maala deunu | Tey praantee Mainaakinee pahunu | Maala greeventa opilee ||

Ovee 64

याउपरांतिक भोगितां राणीव । आचरली पूर्वोक्त तपपर्व । वश केला मनोभावें । रामदूत तियेनें ॥

Transliteration

Yaa-uparaantika bhogitaa raaneevu | Aacharalee poorvokta tapa-parvu | Vasha kelaa mano-bhaave | Raamadoota tiyene ||

Ovee 65

वश झाला अंजनीनंदन । हें पूर्वींच लिहिलें कथन । वायुसुतें मच्छिंद्राकारण । पूर्वी प्रकरण निवेदिलें ॥

Transliteration

Vasha jhaalaa Anjanee-nandanu | Hey poorveencha lihile kathanu | Vaayusute Machchindraa-kaaranu | Poorvee prakarana nivedile ||

Ovee 66

तरी असो ऐसें कथन । सिंहलद्वीपीं मैनाकिनी नाम । माता पितरांच्या आवडींकरुन । नाम ऐसें विराजमान ॥

Transliteration

Taree aso aise kathanu | Sinhala-dveepee Mainaakinee naamu | Maataa pitaraanchyaa aavadeen-karunu | Naama aise viraajale ||

Ovee 67

यापरी सिंहलद्वीपींची दारा । म्हणोनि सर्वांच्या वागुत्तरा । पद्मिनी नाम सर्वोपचार । वोभावती कटकांत ॥

Transliteration

Yaaparee Sinhala-dveepeenchee daaraa | Mhanoni sarvaanchyaa vaaguttaraa | Padminee naama sarva-upachaaru | Vobhaavatee kataka-antu ||

Ovee 68

कीलोतळेचें पावली आसन । म्हणोनि कीलोतळा ऐसें नाम । असो गुप्तरुपें वायुनंदनें । सावध केली कीलोतळा ॥

Transliteration

Keelotaleche paavalee aasanu | Mhanoni Keelotalaa aise naamu | Aso gupta-rupe Vaayu-nandane | Saavadha kelee Keelotalaa ||

Ovee 69

सावध करोनि तीतें । म्हणे कीलोतळे ऐकें मात । तुवां मज ठेवूनि वचनांत । मच्छिंद्रनाथ आणविला ॥

Transliteration

Saavadha karoni teete | Mhane Keelotale aike maatu | Tuvaa maja thevuni vachana-antu | Machchindra-Naatha aanavilaa ||

Ovee 70

तरी तव वचनापासून । सुटलों आहें अर्थ करुन । परी तव सुखासी पातलें विघ्न । मच्छिंद्रशिष्य येतो कीं ॥

Transliteration

Taree tava vachanaa-paasunu | Sutalo aahe artha karunu | Paree tava sukhaasee paatale vighnu | Machchindra-shishya yeto kee ||

Ovee 71

तो मच्छिंद्राहूनि प्रतापवंत । नामीं मिरवला गोरक्षनाथ । तो अजिंक्य असे तयाचें सामर्थ्य । वर्णवेना वाचेसी ॥

Transliteration

Toh Machchindraa-huni prataapa-vantu | Naamee miravalaa Goraksha-Naathu | Toh ajinkya ase tayaache saamarthyu | Varnavenaa vaachesee ||

Ovee 72

म्यां तुझ्यासाठीं यत्न केला । श्रीराम मध्यस्थ घातला । परी अवमानूनि उभयतांला । मच्छिंद्रा नेऊं म्हणतसे ॥

Transliteration

Myaa tujhyaa-saathee yatna kelaa | Shree-Raama madhyastha ghaatalaa | Paree avamaanuni ubhayataalaa | Machchindraa neoo mhanatase ||

Ovee 73

तरी तो आतां येईल येथें । त्यासी सज्ज करुनि प्रीतीतें । गोंवूनि घ्यावा कोणे हितार्थें । सुखसंपत्ती दावूनियां ॥

Transliteration

Taree toh aataa yaeela yethe | Tyaasee sajja karuni preetate | Govuni ghyaavaa kone hitaarthe | Sukha-sampattee daavuni-yaa ||

Ovee 74

परी तो नोहे मच्छिंद्रासमान । विषयीं विरक्त तपोधन । कैसा राहिला नवलविधान । सर्वोपरी विरक्त तो ॥

Transliteration

Paree toh nohe Machchindraa-samaanu | Vishayee virakta tapodhanu | Kaisaa raahilaa navala-vidhaanu | Sarvoparee virakta toh ||

Ovee 75

परी वाचागौरव द्रव्यगौरव । आसनगौरव वसनगौरव । भोजनादि नानावैभवें । गौरवोनि गोंवावा ॥

Transliteration

Paree vaachaa-gauravu dravya-gauravu | Aasana-gaurava vasana-gauravu | Bhojanaadi naanaavaibhave | Gauravoni govaavaa ||

Ovee 76

जैसा जतन करी पावक । संग्रहीं जे गौरवी राख । कीं चिंधीवेष्टणें रक्षणें माणिक । होत आहे शुभाननी ॥

Transliteration

Jaisaa jatana karee paavaku | Sangrahee je gauravee raakhu | Kee chindhee-veshtane rakshane maaniku | Hota aahe shubha-aananee ||

Ovee 77

तैसा बहुविध गौरव करुन । तुष्ट करावें तयाचें मन । ऐसें सांगूनि वायुनंदन । गमन करिता पैं झाला ॥

Transliteration

Taisa bahu-vidha gaurava karunu | Tushta karaave tayanche manu | Aise sanguni Vaayu-nandanu | Gamana karitaa pai jhaalaa ||

Ovee 78

परी ती चपळ मैनाकिनी । मारुती बैसविला कनकासनी । षोडशोपचारें पूजा करोनि । बोळविला महाराजा ॥

Transliteration

Paree tee chapala Mainaakinee | Maarutee baisavilaa kanaka-aasanee | Shodasha-upachaare poojaa karoni | Bolavilaa Mahaaraajaa ||

Ovee 79

स्वस्थाना गेला वायुसुत । येरीकडी गोरक्षनाथ । वेश्याकटकीं मार्गी येत । मुक्काममुक्कामासी साधूनियां ॥

Transliteration

Sva-sthaanaa gelaa Vaayusutu | Yereekadee Goraksha-Naathu | Veshyaa-katakee maargee yetu | Mukkaama-mukkaamaasee saadhuniyaa ||

Ovee 80

जैसे पक्षी करिती गमन । या तरुहूनि त्या तरुवरी जाऊन । तेवीं गोरक्ष मुक्काम करुन । श्रृंगमुरडीं पातला ॥

Transliteration

Jaise pakshee karitee gamanu | Yaa taruhuni tyaa taruvaree jaunu | Tevee Goraksha mukkaama karunu | Shrringa-muradee paatalaa ||

Ovee 81

गांवांनिकट पेठेंत । धर्मशाळा होती त्यांत । वेश्याकटकीं राहूनि तेथ । शिबिरापरी योजिलें ॥

Transliteration

Gaavaa-nnikata pethentu | Dharmashaalaa hotee tyaantu | Veshyaa-katakee rahuni tethu | Shibiraa-paree yojile ||

Ovee 82

मग ती वेश्या मुख्य नायिका । कलिंगा नामें मुख्य दोंदिका । साजसरंजाम घेऊनि निका । राजसदनीं चालिली ॥

Transliteration

Maga tee veshyaa mukhya naayikaa | Kalingaa naame mukhya dondikaa | Saaja-saranjaama gheuni nikaa | Raaja-sadanee chaalilee ||

Ovee 83

सवें वेश्या सात पांच । घेऊनि रुपवंत गुणवंत साच । ऐसे कटकीं करोनि संच । राजांगणीं मिरवली ॥

Transliteration

Save veshyaa saata paanchu | Gheuni rupavanta gunavanta saachu | Aise katakee karoni sanchu | Raaja-anganee miravalee ||

Ovee 84

राजद्वारीं उभी राहून । पाठविलें वर्तमान । द्वाररक्षकें आंत जाऊन । वेश्याकटकीं सांगितलें ॥

Transliteration

Raaja-dvaaree ubhee rahunu | Paathavile vartamaanu | Dvaara-rakshake aanta jaunu | Veshyaa-katakee saangitale ||

Ovee 85

हे महाराजा राजद्वारीं । कलावती कलाकुसरी । रुपवती गुणगंभीरी । भेटीलागीं पातली ॥

Transliteration

Hey Mahaaraajaa raaja-dvaaree | Kalaa-vatee kalaakusaree | Rupavatee guna-gambheeree | Bheteelaagee paatalee ||

Ovee 86

तरी आज्ञेप्रमाणें वदूं तीतें । ऐसी ऐकतां कीलोतळा मात । म्हणे घेऊनि या सभास्थानांत । अवघे समारंभेंसीं ॥

Transliteration

Taree aajnye-pramaane vadoo teete | Aisee aikataa Keelotalaa maatu | Mhane gheuni yaa sabhaa-sthaana-antu | Avaghe samaarambhensee ||

Ovee 87

ऐसें ऐकतां द्वारीं दूतीं । सवेंचि पातली द्वारावती । घेऊनि कलिंगा कलावती । सभास्थानीं पातली ॥

Transliteration

Aise aikataa dvaaree dootee | Savenchi paatalee dvaaraa-vatee | Gheuni Kalingaa kalaa-vatee | Sabhaa-sthaanee paatalee ||

Ovee 88

तों कनकतगटीं रत्नकोंदणीं । मच्छिंद्र मिरवला कनकासनीं । निकट बैसली मैनाकिनी । निजभारें शोभली ॥

Transliteration

Toh kanakatagatee ratna-kondanee | Machchindra miravalaa kanaka-aasanee | Nikat baisalee Mainaakinee | Nijabhaare shobhalee ||

Ovee 89

जैसा नभीं उडुगणज्योती । मध्यें मिरवला रोहिणीपती । त्याचि न्यायें मच्छिंद्राभोंवतीं । सकळ स्त्रिया विराजल्या ॥

Transliteration

Jaisaa nabhee udugana-jyotee | Madhye miravalaa rohinee-patee | Tyaachi nyaaye Machchindraa-bhovatee | Sakala striyaa viraajalyaa ||

Ovee 90

कीं तेजःपुंज हाटकासनीं । हिरा मिरवला शुद्ध कोंदणीं । नवरत्न हिरे वेष्टित हिरकणी । तैसा शोभला मच्छिंद्र ॥

Transliteration

Kee tejahpunja haatakaasanee | Hiraa miravalaa shuddha kondanee | Navaratna hire veshtita hirakanee | Taisaa shobhalaa Machchindru ||

Ovee 91

कीं शैल्या नव्हेत त्या रश्मिज्वाला । मध्यें मच्छिंद्र अर्कगोळा । कनकासनीं ते सदनीं सकळा । राजसभेंत मिरवत ॥

Transliteration

Kee shailyaa navheta tyaa rashmi-jvaalaa | Madhye Machchindra Arkagolaa | Kanaka-aasanee tey sadanee sakalaa | Raaja-sabhenta miravatu ||

Ovee 92

असो ऐसी सभा सघन । कलिंगा दृष्टीनें पाहोन । मग बोलती झाली सभे वचन । मैनाकिनीरायातें ॥

Transliteration

Aso aisee sabhaa saghanu | Kalingaa drishteene paahonu | Maga bolatee jhaalee sabhe vachanu | Mainaakinee-raayaate ||

Ovee 93

हे महाराजा शैल्यापती । ऐकूंनि नामाभिधानकीर्ती । सोडूनि आपुल्या देशाप्रती । येथें आलें महाराजा ॥

Transliteration

Hey Mahaaraajaa shailyaapatee | Aikuni naamaabhidhaana-keertee | Soduni aapulyaa deshaapratee | Yethe aale Mahaaraajaa ||

Ovee 94

तरी कीर्तिध्वजा फडकत अवनीं । तैसी अवलोकनीं आली करणी । मही कलावंत राजभुवनीं । विराजतसे महाराजा ॥

Transliteration

Taree keerti-dhvajaa phadakata avanee | Taisee avalokanee aalee karanee | Mahee kalaa-vanta raaja-bhuvanee | Viraajatase Mahaaraajaa ||

Ovee 95

बृहद्रथ राजा हस्तिनापुरीं । कीर्तिध्वज धर्माचारी । याचि नीतिं बंगालधरित्रीं । गोपीचंद विराजला ॥

Transliteration

Brihadratha raajaa Hastinaapuree | Keertidhvaja dharmaa-chaaree | Yaachi neeti bangaala-dharitree | Gopeechanda viraajalaa ||

Ovee 96

याचि नीतीं कीर्तिध्वज । शैल्यादेशीं कीलोतळानाम राज । ऐसी वरुनि सत्कीर्तिभाज । येथें आलें महाराजा ॥

Transliteration

Yaachi neetee keertidhvaju | Shailyaa-deshee Keelotalaanaama raaju | Aisee varuni satkeertibhaaju | Yethe aale Mahaaraajaa ||

Ovee 97

ऐसी बोलतां कलिंगा युवती । परम तोषला कीलोतळाभूपपती । मग समुच्चयें विचार करोनि अन्नभुक्ती । देऊनि बोले कीलोतळा ॥

Transliteration

Aisee bolataa Kalingaa yuvatee | Parama toshalaa Keelotalaa-bhoopapatee | Maga samuchchaye vichaara karoni annabhuktee | Deuni bole Keelotalaa ||

Ovee 98

तंव ती कलिंगा येऊनि शिबिरीं । माध्यान्हसमया सारोनि उपरी । साजसरंजाम सजूनी परी । सावध रात्रीं बैसली ॥

Transliteration

Tava tee Kalingaa yeuni shibiree | Maadhyaanha-samayaa saaroni uparee | Saaja-saranjaama sajuunee paree | Saavadha raatree baisalee ||

Ovee 99

तों येरीकडे मैनाकिनी । येऊनि बैसली सभास्थानीं । सभामंडप श्रृंगारोनी । दीपमाळ रचियेल्या ॥

Transliteration

Toh yereekade Mainaakinee | Yeuni baisalee sabhaa-sthaanee | Sabhaa-mandapa shrringaaronee | Deepamaala rachiyelyaa ||

Ovee 100

लावूनि स्फटिकांची कूपिका । मेणबत्ती लावोनि दीपका । अगरबत्तीगंध लोका । घ्राणोघ्राणीं मिरवतसे ॥

Transliteration

Lavuni sphatikaanchee koopikaa | Menabattee laavoni deepakaa | Agarabattee-gandha lokaa | Ghraano-ghraanee miravatase ||

Ovee 101

तबकीं भरोनि गंगेरी पानें । विडे रचिले त्रयोदशगुणी । त्यांत फुलें अत्तरदाणी । लोकांमाजी मिरवतसे ॥

Transliteration

Tabakee bharoni gangeree paane | Vide rachile trayodasha-gunee | Tyaanta phule attaradaanee | Lokaam-maajee miravatase ||

Ovee 102

ऐसिये सभे कटकासन । मूळ पाठविलें कलिंगेलागून । तंव ती आपुला सरंजाम घेऊन । दिव्यतेजें मिरवली ॥

Transliteration

Aisiye sabhe katakaasanu | Moola paathavile Kalingelaagunu | Tava tee aapulaa saranjaama gheunu | Divyateje miravalee ||

Ovee 103

येरी कलिंगा राजसदना जात । सवें चालिला गोरक्षनाथ । परी कलिंगे पाचारोनि एकान्त । गुज सांगे तियेसी ॥

Transliteration

Yeree Kalinga raaja-sadanaa jaatu | Save chaalilaa Goraksha-Naathu | Paree Kalinge paachaaroni ekaantu | Guja saange tiyesee ||

Ovee 104

म्हणे वो ऐकें गुणगंभीरी । तूं नाट्या करिसील सभेभीतरी । तरी मृदंगवाद्य माझें करीं । सभास्थानीं ओपीं कां ॥

Transliteration

Mhane vo aike guna-gambheeree | Too naatyaa kariseela sabhe-bhee-taree | Taree mridanga-vaadya maajhe karee | Sabhaa-sthaanee opee kaa ||

Ovee 105

शैल्यासभे कटकस्थानीं । रिझवितां माझें वाजवणीं । मग द्रव्यलाभ घे ओढोनि । मानेल तैसें माग तेथें ॥

Transliteration

Shailyaa-sabhe kataka-sthaanee | Rijhavitaa maajhe vaajavanee | Maga dravyalaabha ghe odhoni | Maanela taise maaga tethe ||

Ovee 106

ऐसें ऐकतां कलिंगा वदत । हे वरिष्ठ महाराजा गुणसमर्थ । सभेस्थानीं स्त्रिया समस्त । पुरुष नसे त्या ठायीं ॥

Transliteration

Aise aikataa Kalingaa vadatu | Hey varishtha Mahaaraajaa guna-samarthu | Sabhe-sthaanee striyaa samastu | Purusha nase tyaa thaayee ||

Ovee 107

तरी तुम्हांलागीं तेथें नेतां । वितर्क वाढेल संशय चित्ता । स्त्रीदेशांत पुरुष व्यक्त । कोठेंचि नाहीं म्हणोनि ॥

Transliteration

Taree tumhaa-laagee tethe netaa | Vitarka vaadhela sanshaya chittaa | Stree-deshaanta purusha vyaktu | Kothenchi mhanoni ||

Ovee 108

ऐसें ऐकूंनि तपोद्रुम । म्हणे ऐकें वो सुमध्यमे । अंगनावेषें येतों नटून । रंग तुझा लुटावया ॥

Transliteration

Aise aikuni tapodrumu | Mhane aike vo sumadhyame | Anganaaveshe yeto natunu | Ranga tujhaa lutaavayaa ||

Ovee 109

माझी इच्छा होईल पूर्ण । तूतेंही मिळेल अपार धन । मग ती कलिंगा आवडीन । अवश्य नाथा म्हणतसे ॥

Transliteration

Maajhee ichchaa hoeela poornu | Tootenhee milela apaara dhanu | Maga tee Kalingaa aavadeenu | Avashya Naathaa mhanatase ||

Ovee 110

मग लेवूनि कंचुकीसार । परिधानिलें उत्तर चीर । जटावियुक्त करोनि भार । भांग मुक्तांनीं भरियेला ॥

Transliteration

Maga levuni kanchukee-saaru | Paridhaanile uttara cheeru | Jataaviyukta karoni bhaaru | Bhaanga muktaannee bhariyelaa ||

Ovee 111

भाळीं चर्चूनि कुंकुमकोर । सोगया अंजनीं मिरवले नेत्र । कबरीवरुनि चीरपदर । नाभिस्थानीं खोविला ॥

Transliteration

Bhaalee charchuni kunkumakoru | Sogayaa Anjanee miravale netru | Kabaree-karuni cheerapadaru | Naabhi-sthaanee khovilaa ||

Ovee 112

काढोनि कर्णमुद्रिकाभूषण । ताटंकें केली परिधान । तेही कोंदणीं जडावरत्नें । नक्षत्रांसम झळकती ॥

Transliteration

Kaadhoni karna-mudrikaa-bhooshanu | Taatanke kelee paridhaanu | Tehee kondanee jadaavaratne | Nakshatraansama jhalakatee ||

Ovee 113

कीं एकाग्र करुनि रोहिणीपती । करुं पातले श्रवणीं वस्ती । मुक्तघोष नासिकाप्रती । सरजी नथ शोभतसे ॥

Transliteration

Kee ekaagra karuni rohinee-patee | Karu paatale shravanee vastee | Mukta-ghosha naasikaa-pratee | Sarajee natha shobhatase ||

Ovee 114

पाचकंकणजडित भूषण । ग्रीवेमाजी अपार हेम । नाना नगीं हाटकगुण । मुक्तलडा शोभल्या ॥

Transliteration

Paachakankana-jadita bhooshanu | Greevemaajee apaara hemu | Naanaa nagee haataka-gunu | Muktaladaa showbhalyaa ||

Ovee 115

असो आतां किती वर्णन । अंगनावेषें गोरक्षनंदन । परम शोभला चपळेवणु । वेश्यांगणीं तळपतसे ॥

Transliteration

Aso aataa kitee varnanu | Anganaaveshe Goraksha-nandanu | Parama shobhalaa chapale-vanu | Veshyaanganee talapatase ||

Ovee 116

आधींच पूर्ण हेमकांती अवतारी । त्यावरी नटला हेमशृंगारीं । मग वर्णदशास्वरुपापरी । रंभा दासी शोभली ॥

Transliteration

Aadheencha poorna hemakaantee avataaree | Tyaa-varee natalaa hema-shrringaaree | Maga varnadashaa-svarupaaparee | Rambhaa daasee shobhalee ||

Ovee 117

ऐसिया आव्हानूनि पैंजणी ती । मृदंग कवळूनि प्रतिहाती । नटनृत्यस्वरुपीं राजपंक्तीं । जाणूनियां मिरवली ॥

Transliteration

Aisiyaa aavhaanuni painjanee tee | Mridanga kavaluni pratihaatee | Nata-nritya-svarupee raaja-panktee | Jaanuniyaa miravalee ||

Ovee 118

परी त्या शैल्या शुभाननी । पाहती पुरवंडा सुलोचनी । एकमेकां बोलती वाणी । मदनबाळी हेही असे ॥

Transliteration

Paree tyaa shailyaa shubha-aananee | Paahatee puravandaa sulochanee | Ekamekaa bolatee vaanee | Madanabaalee hehee ase ||

Ovee 119

सकळ नाट्यकलावती । विकळस्वरुप नीच दिसती । म्हणती धन्य विधात्याप्रती । रचिली मूर्ति अनुपम्य ॥

Transliteration

Sakala naatya-kalaavatee | Vikala-sva-rupa neecha disatee | Mhanatee dhanya vidhaatyaa-pratee | Rachilee moorti anupamyu ||

Ovee 120

समस्त वंदू जरी उर्वशी । तरी हिच्यापुढें वाटती दासी । चपळातेजें सहजेंसीं । तळपत आहे बाळी हे ॥

Transliteration

Samasta vandoo jaree Urvashee | Taree hichyaapudhe vaatatee daasee | Chapalaateje sahajensee | Talapata aahe baalee hey ||

Ovee 121

साज सोडोनि प्रत्योदक । नाद दर्शवी अलौकिक । पाहतेपणीं पडूनि टक । विस्मयातें पडती त्या ॥

Transliteration

Sahaja sodoni pratyodaku | Naada darshavee alaukiku | Paahate-panee paduni taku | Vismayaate padatee tyaa ||

Ovee 122

वाद्यनादानें व्यक्तींत । मेळवी ताल अति अद्भुत । परी सकळ शैल्यांचें चक्षु तेथ । एका ठायीं मीनले ॥

Transliteration

Vaadya-naadaane vyakteentu | Melavee taala ati adbhutu | Paree sakala shailyaanche chakshu tethu | Ekaa thaayee meenale ||

Ovee 123

कलिंगा मुख्य नायकिणी । परी पुरवंडा दैन्यवाणी । जेवीं उदया येतां तरणी । सकळ तेजा लोपती ॥

Transliteration

Kalingaa mukhya naayakinee | Paree puravandaa dainya-vaanee | Jaishaa udayaa yetaa taranee | Sakala tejaa lopatee ||

Ovee 124

असो नाट्यदारा कलिंगेसहित । उभ्या राहिल्या करुं नृत्य । तैं कटी कवळूनि मृदंगातें । कुशळ वाजवी पुरवंडा ॥

Transliteration

Aso naatya-daaraa Kalinge-sahitu | Ubhyaa raahilyaa karu nrityu | Tai katee kavaluni mridangaate | Kushala vaajavee puravandaa ||

Ovee 125

संगीत स्वरित गायन । शैल्या सकळ तुकाविती मान । अहा अहा बोलूनि वचन । धन्य म्हणती कलिंगा ॥

Transliteration

Sangeeta svarita gaayanu | Shailyaa sakala tukaavitee maanu | Ahaa ahaa boluni vachanu | Dhanya mhanatee Kalingaa ||

Ovee 126

सकळ शैल्या सभांगणीं । त्यांत मच्छिंद्रनाथ कनकासनीं । पदमाळिके चिंतामणी । हिरा चमक दावीतसे ॥

Transliteration

Sakala shailyaa sabhaanganee | Tyaanta Machchindra-Naatha kanaka-aasanee | Kee pada-maalike chintaa-manee | Hiraa chamaka daaveetase ||

Ovee 127

पुढारां पाहूनि गुरुनाथ । मनींच्या मनीं नमन करीत । परम हेलावे आनंदे चित्त । म्हणे कृतार्थ झालों मी ॥

Transliteration

Pudhaaraa pahuni guru-Naathu | Maneenchyaa manee namana kareetu | Parama helaave aanande chittu | Mhane kritaartha jhaalo mee ||

Ovee 128

आतां श्रीगुरुचे पाहिले चरण । सकळ झालों तापहीन । मग स्फुरण ये कुशळपणीं । वाद्यकळा मिरवितसे ॥

Transliteration

Aataa Shreeguru-che paahile charanu | Sakala jhaalo taapa-heenu | Maga sphurana ye kushala-panee | Vaadyakalaa miravitase ||

Ovee 129

तैं नृत्य गीत संगीत होतां । पाहूनि लाजे विधिदुहिता । लाजत अप्सरा गंधर्व माथा । ठेवूनि पाहती चरणांतें ॥

Transliteration

Tai nritya geeta sangeeta hotaa | Pahuni laaje vidhi-duhitaa | Laajata apsaraa Gandharva maathaa | Thevuni paahatee charanaante ||

Ovee 130

तानमान रंगप्रकार । तल्लीन झाले सकळ भार । मान तुकावूनि नाथ मच्छिंद्र । अहा अहा म्हणतसे ॥

Transliteration

Taana-maana ranga-prakaaru | Talleena jhaale sakala bhaaru | Maana tukaavuni Naatha Machchindru | Ahaa ahaa mhanatase ||

Ovee 131

मग परिधानावया उंची वस्त्र । काढूनि हस्तें देत मच्छिद्रनाथ । तों पुढारां पाहूनि हर्ष बळवंत । लाघवकळे वर्तवी ॥

Transliteration

Maga paridhaanaa-vayaa unchee vastru | Kaadhuni haste deta machchidranaathu | Toh pudhaaraa pahuni harsha balavantu | Laaghava-kale vartavee ||

Ovee 132

मृदंगवाद्य वाजवितां । अद्भुतपणा कुशळता । तया नादातें अक्षरव्यक्ता । भांती भांती काढीतसे ॥

Transliteration

Mridangavaadya vaajavitaa | Adbhuta-panaa kushalataa | Tayaa naadaate akshara-vyaktaa | Bhaantee bhaantee kaadheetase ||

Ovee 133

त्या अक्षरांमाजी अक्षर । मच्छिंद्रनामें चमत्कार । दावूनि पुढें तोचि व्यवहार । रंगासमान नाचवी ॥

Transliteration

Tyaa aksharaa-mmaajee aksharu | Machchindra-naame chamatkaaru | Davuni pudhe tochi vyavahaaru | Rangaa-samaana naachavee ||

Ovee 134

मृदंग अक्षरी तैसी चर्चा । दावितसे गुरुवर्या । चलो मच्छिंदर गोरक्ष आया । पुन्हां अक्षरें आच्छादी ॥

Transliteration

Mridanga aksharee taisee chariyaa | Davitase guruvaryaa | Chalo Machchindara Goraksha aayaa | Punhaa akshare aachchaadee ||

Ovee 135

परी अक्षरें मच्छिंद्रातें । श्रवण होतां पाहे भंवतें । चित्तीं चाकटूनि म्हणे येथें । कोठूनि आला गोरक्ष ॥

Transliteration

Paree akshare Machchindraate | Shravana hotaa paahe bhavate | Chittee chaakatuni mhane yethe | Kothuni aalaa Gorakshu ||

Ovee 136

येरीकडे सहज चालीं । गोरक्ष वाजवी गायकपाउलीं । रंजीत देखतां गुरुमाऊली । तींचि अक्षरें आणितसे ॥

Transliteration

Yereekade sahaja chaalee | Goraksha vaajavee gaayana-paaulee | Ranjeeta dekhataa guru-maaoolee | Teenchi akshare aanitase ||

Ovee 137

आणितां अक्षरें पूर्वव्यक्त । होतांची मच्छिंद्र दचकत । भवतें पाहूनि गोरक्षनाथ । कोठे आहे म्हणतसे ॥

Transliteration

Aanitaa akshare poorvavyaktu | Hotaanchi Machchindra dachakatu | Bhavate pahuni Goraksha-Naathu | Kothe aahe mhanatase ||

Ovee 138

शैल्या आणि कलावासिनी । तयासी व्यक्त न पाहतां नयनीं । कोठूनि पडतसे अक्षरध्वनीं । श्रवणीं साजणीं आमुचे ॥

Transliteration

Shailyaa aani kalaa-vaasinee | Tayaasee vyakta na paahataa nayanee | Kothuni padatase aksharadhvanee | Shravanee aamuche saajanee ||

Ovee 139

पिशाचवाणी भंवती पाहातसे । घडीघडी चित्त दचकतसे । थडाथडोनी हृदय उडतसे । आला गोरक्ष म्हणोनी ॥

Transliteration

Pishaacha-vaanee bhavatee paahaatase | Ghadee-ghadee chitta dachakatase | Thadaa-thadonee hridaya udatase | Aalaa Goraksha mhanonee ||

Ovee 140

मग न आवडे सभा कनकासन । मुख वाळलें झालें म्लान । मग कोणी ऐकेना गायन । चित्तीं फार व्यापिले ॥

Transliteration

Maga na aavade sabhaa kanakaasanu | Mukha vaalale jhaale mlaanu | Maga konee aikenaa gaayanu | Chittee phaara vyaapile ||

Ovee 141

चलो मच्छिंदर गोरख आया । जंव जंव अक्षरें हीं ऐकूंनियां । तंव तंव दचकूनि गेली काया । काळिमा तेव्हां येतसे ॥

Transliteration

Chalo Machchindara Gorakha aayaa | Java java akshare hee aikuni-yaa | Tava tava dachakuni gelee kaayaa | Kaalimaa tevhaa yetase ||

Ovee 142

तंव पाहूनि कीलोतळा । हृदयीं पेटूनि चिंतानळा । काळिंबी काया म्हणूनि सकळा । रोमांच उठती शरीरीं ॥

Transliteration

Tava pahuni Keelotalaa | Hridayee petuni chintaanalaa | Kaalimbee kaayaa mhanuni sakalaa | Romaancha uthatee shareeree ||

Ovee 143

तंव पाहूनि कीलोतळा । म्हणे महाराजा तपपाळा । सुरस रंगीं मुखकमळा । काळिंबी कां वरियेली ॥

Transliteration

Tava pahuni Keelotalaa | Mhane Mahaaraajaa tapa-paalaa | Surasa rangee mukha-kamalaa | Kaalimbee kaa variyelee ||

Ovee 144

येरी म्हणे वो मैनाकिनी । मातें दिसते विपरीत करणी । मच्छिंद्रशिष्य गोरक्ष अवनीं । भय आहे तयाचें ॥

Transliteration

Yeree mhane vo Mainaakinee | Maate disate vipareeta karanee | Machchindra-shishya Goraksha avanee | Bhaya aahe tayaache ||

Ovee 145

तो परम पवित्र भक्तचूडामणि । विषया नातळे इंद्रियदमनीं । महाप्रतापें तपोखाणी । बैरागी तो असे हो ॥

Transliteration

Toh parama pavitra bhakta-choodaamani | Vishayaa naatale indriya-damanee | Mahaaprataape tapokhaanee | Bairaagee toh ase ho ||

Ovee 146

अगे तो येतां तंव पट्टणीं । नेईल माते स्वदेशअवनीं । मग तव यतीची सुखयामिनी । गोरक्षअंकीं नासेल ॥

Transliteration

Aghe toh yetaa tava pattanee | Neeela maate sva-desha-avanee | Maga tava yateechee sukhayaaminee | Goraksha-ankee naaselu ||

Ovee 147

ऐसें ऐकतां कीलोतळा । मारुतिसूचनेचा खूणगरळा । हृदयीं व्यापूनि जाळूं लागला । मुख कोमावितीं पैं झाली ॥

Transliteration

Aise aikataa Keelotalaa | Maaruti-soochanechaa khoonagaralaa | Hridayee vyaapuni jaaloo laagalaa | Mukha komaavitee pai jhaalee ||

Ovee 148

मग तो रंग नाट्यकृती । विरस होऊनि नावडे चित्तीं । हृदयालयीं ते चिंताभगवती । नांदती झाली प्रत्यक्ष ॥

Transliteration

Maga toh ranga naatyakritee | Viras houni naavade chittee | Hridayaa-layee tey chintaa-bhagavatee | Nandatee jhaalee pratyakshu ||

Ovee 149

नाट्यरंगाचा आनंदवेष । बळी आव्हानिला एकचि भाष । मग रंगदेवता पडूनि ओस । उठवी आपुल्या ठाण्यातें ॥

Transliteration

Naatya-rangaachaa aanandaveshu | Balee aavhaanilaa ekachi bhaashu | Maga ranga-devataa paduni osu | Uthavee aapulyaa thaanyaate ||

Ovee 150

जैसी पयसैंधवां पडे गांठी । मग विरस होऊनि नासल्या गोष्टी । मिरवला हा तन्न्यायः पोटीं । भय उभयतां आतळे ॥

Transliteration

Jaisee paya-saindhavaa pade gaanthee | Maga virasa houni naasalyaa goshtee | Miravalaa haa tannyaayah potee | Bhaya ubhayataa aatale ||

Ovee 151

परी ती चतुर मैनाकिनी । गायनस्वर आव्हान कानीं । तों मृदंगवाद्यीं उठोनि ध्वनी । चलो गुप्त गोरक्ष आया ॥

Transliteration

Paree tee chatura Mainaakinee | Gaayanasvara aavhaana kaanee | Toh mridanga-vaadyee uthoni dhvanee | Chalo gupta Goraksha aayaa ||

Ovee 152

ऐसा नाद अक्षरस्थित । कीलोतळा श्रवण करीत । मग बोलावूनि कलावंत । उत्तरातें आराधी ॥

Transliteration

Aisaa naada akshara-sthitu | Keelotalaa shravana kareetu | Maga bolaavuni kalaa-vantu | Uttaraate aaraadhee ||

Ovee 153

म्हणे तव सारंगी संगीती । वाजत आहे उत्तमा गतीं । परी आमुच्या साजसंग्रहाप्रती । आजी पाहूं वाजवोनी ॥

Transliteration

Mhane tava saarangee-sangeetee | Vaajata aahe uttamaa gatee | Paree aamuchyaa saaja-sangrahaa-pratee | Aajee paahoo vaajavonee ||

Ovee 154

ऐसें ऐकतां कलिंगा पद्मिनी । म्हणे आणा पाहूं वाजवोनी । मग ती कीलोतळा आज्ञापोनी । साज आणूनि ठेवीतसे ॥

Transliteration

Aise aikataa Kalingaa Padminee | Mhane aanaa paahoo vaaja-vonee | Maga tee Keelotalaa aajnyaaponee | Saaja anuni theveetase ||

Ovee 155

तोही साज पुढें घेऊनी । वाजविती कुशलपणीं । परी सुस्वर गाण्यांत अक्षर पूर्ण । तेंचि काढी पुन्हां पुन्हां ॥

Transliteration

Tohee saaja pudhe gheuunee | Vaajavitee kushala-panee | Paree susvara gaanyaanta akshara poornu | Tenchi kaadhee punhaa punhaa ||

Ovee 156

तेंही ऐकूनि मैनाकिनी । मग सेविका आपुली कलावंतिनी । कलिंगाचा साज देऊनि । उभी केली पाठीमागें ॥

Transliteration

Tehee aikuni Mainaakinee | Maga sevikaa aapulee kalaa-vantinee | Kalingaachaa saaja deuni | Ubhee kelee paathee-maage ||

Ovee 157

तीतें सांगे रहस्ययुक्ती । पुढारां वाद्यें अक्षरें काढिती । त्याची नीतीं अक्षरस्थिती । तूंही बोलवीं मृदंगा ॥

Transliteration

Teete saange rahasya-yuktee | Pudhaaraa vaadye akshare kaadhitee | Tyaachee neetee akshara-sthitee | Toonhee bolavee mridangaa ||

Ovee 158

परी ती वाजवितां कलावंतिणी । तैसीं अक्षरें न याती कानीं । मग पुरवंडेचा हात धरोनी । एकांतासी पैं गेली ॥

Transliteration

Paree tee vaajavitaa kalaavantinee | Taisee akshare na yetee kaanee | Maga puravandechaa haata dharonee | Ekaantaasee pai gelee ||

Ovee 159

सलीलपणीं चरणीं माथा । ठेवूनि पुसे तीस वार्ता । माये तूं कोण सांग आतां । सकळ संशय सोडोनी ॥

Transliteration

Saleela-panee charanee maathaa | Thevuni puse teesa vaartaa | Maye too kona saanga aataa | Sakala sanshaya sodonee ||

Ovee 160

जरी ही गोष्ट ठेविसी चोरुन । तरी तुज तुझ्या गुरुची आण । मातें वदें कीं प्रांजलपण । कोणकोणाची तूं अससी ॥

Transliteration

Jaree hee goshta thevisee chorunu | Taree tuja tujhyaa Guruchee aanu | Mate vade kee praanjala-panu | Kona-kona-achee too asasee ||

Ovee 161

ऐसी भूषिणी बोलतां वचन । मनांत विचारी गोरक्षनंदन । प्रकट होण्याचा समय पूर्ण । हाचि सुलक्षण दिसतसे ॥

Transliteration

Aisee bhooshinee bolataan vachanu | Manaanta vichaaree Goraksha-nandanu | Prakata honyaachaa samaya poornu | Haachi sulakshana disatase ||

Ovee 162

मग बोलता झाला प्रांजळ वचन । माये मी नसे सर्वथा नसे कामिण । श्रीमच्छिंद्राचा प्रियनंदन । गोरक्षनामें मिरवतसें ॥

Transliteration

Maga bolataa jhaalaa praanjala vachanu | Maye mee nase sarvathaa nase kaaminu | Shree-Machchindra-achaa priya-nandanu | Goraksha-naame miravatase ||

Ovee 163

तरी स्त्रीवेषनटी नारी । नटोनि निघों तव राजद्वारीं । ऐसें ऐकतां ती सुंदरी । पुन्हां चरणीं लोटली ॥

Transliteration

Taree stree-vesha-natee naaree | Natoni nighe tava raaja-dvaaree | Aise aikataa tee sundaree | Punhaa charanee lotalee ||

Ovee 164

मग पुरुषपरिधान आणोनि त्वरित । श्रीगोरक्षनाथा नेसवीत । म्हणे तूं माझा सुत । भेटलासी दैवानें ॥

Transliteration

Maga purusha-paridhaana aanoni tvaritu | Shree-Goraksha-Naathaa nesaveetu | Mhane too maajhaa sutu | Bhetalaasee daivaane ||

Ovee 165

पूर्वी नाथानें नामाभिधान । तव रुपीं केलें निवेदन । निवेदन होतांचि तनमनप्राण । तव भेटी उदेले ॥

Transliteration

Poorvee Naathaane naama-abhidhaanu | Tava rupee kele nivedanu | Nivedana hotaanchi tana-mana-praanu | Tava bhetee udele ||

Ovee 166

सांगू उदेले परी काय । जैसें सेवितां कां जगन्याय । कीं गृहीं वत्स काननीं गाय । परी प्राण वत्सा ठेवीतसे ॥

Transliteration

Saangoo udele paree kaayu | Jaise sevitaa kaa jaga-nyaayu | Kee grihee vatsa kaananee gaayu | Paree praana vatsaa theveetase ||

Ovee 167

कीं जळावेगळी मासोळी । होतां रिघूं पाहे पुन्हां जळीं । तन्न्यायें मोहकाजळी लागली । तुजसाठीं मज बा रे ॥

Transliteration

Kee jalaa-vegalee maasolee | Hotaa righoo paahe punhaa jalee | Tannyaaye moha-kaajalee laagalee | Tuja-saathee maja baa re ||

Ovee 168

मग हाटकश्रृंगार करुनि व्यक्त । जडितकोंदणीं लेववीत । रत्नमुद्रिका रणबिंदीसहित । मुक्ततुरा लाविला ॥

Transliteration

Maga haataka-shrringaara karuni vyaktu | Jaditakondanee levaveetu | Ratna-mudrikaa ranabindee-sahitu | Muktaturaa laavilaa ||

Ovee 169

भरजरीचे कनकवर्णी । परिधानिला चीरभूषणीं । मस्तकीं मंदिल नवरत्नी । शिरपेंच वरी जडियेला ॥

Transliteration

Bharajareeche kanaka-varnee | Paridhaanilaa cheera-bhooshanee | Mastakee mandila nava-ratnee | Shirapencha varee jadiyelaa ||

Ovee 170

हस्ताग्रीं बाहुवट । हेमकोंदणीं लखलखाट । सर्व भूषणीं तेजवट । श्रृगांरिला नाथ तो ॥

Transliteration

Hastaagree baahuvatu | Hemakondanee lakha-lakhaatu | Sarva bhooshanee tejavatu | Shrrigaarilaa Naatha toh ||

Ovee 171

मग हस्त धरुनि कीलोतळा । येती झाली सभामंडळा । येतांचि मच्छिंद्रें देखिली डोळां । पुरुषव्यक्त कामिनी ॥

Transliteration

Maga hasta dharuni Keelotalaa | Yeti jhaalee sabhaa-mandalaa | Yetaanchi Machchindre dekhilee dolaa | Purusha-vyakta kaaminee ||

Ovee 172

मनांत म्हणे मच्छिंद्रनाथ । पुरुष कैंचा आला येथ । निकट येतां कीलोतळेतें । हस्तें खुणावी कोण तो ॥

Transliteration

Manaanta mhane Machchindra-Naathu | Purusha kainchaa aalaa yethu | Nikat yetaa Keelotale tey | Haste khunaavee kona toh ||

Ovee 173

येरीकडे हस्तखुणे संकेतीं । पाहूनि म्हणे गोरक्षजती । तुमचा उद्देश धरुनि चित्तीं । भेटीलागीं पातला ॥

Transliteration

Yereekade hasta-khune sanketee | Pahuni mhane Goraksha-jatee | Tumachaa uddesha dharuni chittee | Bhetee-laagee paatalaa ||

Ovee 174

परी आज उदेला दैवआदित्य । भेटला माझा प्राणसुत । सकळ राज्याचा धैर्यवंत । बाळ गोरक्ष माझा हा ॥

Transliteration

Paree aaja udelaa daiva-Aadityu | Bhetalaa maajhaa praana-sutu | Sakala raajya-achaa dhairya-vantu | Baala Goraksha maajhaa haa ||

Ovee 175

आतां सकळ कांचणी ।िटूनि गेली अंतःकरणीं । सकळ वैभव राजमांडणी । संगोपील बाळ हा ॥

Transliteration

Aataa sakala kaanchanee | Phituni gelee antah-karanee | Sakala vaibhava raaja-maandanee | Sangopeela baala haa ||

Ovee 176

आणि पाठिंबा बळिवंत । सहोदर वडील गोरक्षनाथ । धाकुटा मीन तुमचा सुत । संगोपील तयासी ॥

Transliteration

Aani paathimbaa balivantu | Sahodara vadeela Goraksha-Naathu | Dhaakutaa Meena tumachaa sutu | Sangopeela tayaasee ||

Ovee 177

म्हणूनि समूळ माझी कांचणी । फिटूनि गेली दूर अवनीं । वृद्धापकाळीं चक्रपाणी । कृपें वेष्टिला आपणासी ॥

Transliteration

Mhanuni samoola maajhee kaanchanee | Phituni gelee doora avanee | Vriddhaa-pakaalee Chakra-paanee | Kripe veshtilaa aapanaasee ||

Ovee 178

ऐसें बोलतां मैनाकिनी । गोरक्ष हास्य करीं मनीं । चित्तीं म्हणे बळेंचि तरणी । अंधारचीरीं भूषीतसे ॥

Transliteration

Aise bolataan Mainaakinee | Goraksha haasya karee manee | Chittee mhane balenchi taranee | Andhaara-cheeree bhoosheetase ||

Ovee 179

आम्ही विरक्त शुद्ध वैष्णव । आम्हां कासयासी वैभव । विधवेलागीं कुंकुमटेव । खटाटोप कासया ॥

Transliteration

Aamhee virakta shuddha Vaishnavu | Aamhaa kaasayaasee vaibhavu | Vidha-velaagee kunkumatevu | Khataatopa kaasayaa ||

Ovee 180

कीं परिसालागीं कनकशृंगार । कीं तक्रीं तुष्टती देव अमर । तैसे आम्ही विरक्त थोर । राजवैभव कासया ॥

Transliteration

Kee parisaalaagee kanaka-shringaaru | Kee takree tushtatee deva amaru | Taise aamhee virakta thoru | Raaja-vaibhava kaasayaa ||

Ovee 181

कीं ग्रामगौतमीची कांस । दुग्ध काढूनि अंजुळीस । तें पयोब्धीस पाजूनि सुरस । तुष्ट चित्तीं मिरवला ॥

Transliteration

Kee graama-Gautameechee kaansu | Dugdha kaadhuni anjuleesu | Tey payobdheesa paajuni surasu | Tushta chittee miravalaa ||

Ovee 182

कीं सकळ महीचा नृपनाथ । अंजुळी धान्याचा गरजवंत । की मित्र तेजाचि भिक्षा मागत । काजव्यातें जाऊनि ॥

Transliteration

Kee sakala maheechaa nripanaathu | Anjulee dhaanya-achaa garajavantu | Kee Mitra tejaachi bhikshaa maagatu | Kaajavyaate jauni ||

Ovee 183

तयाचि न्यायें आम्हांसी वैभव । कायसें पद थोर राणीव । येरी जल्पतसे आपुला भाव । निःसंगा संग जाऊनी ॥

Transliteration

Tayaachi nyaaye aamhaansee vaibhavu | Kaayase pada thora raaneevu | Yeree jalpatase aapulaa bhaavu | Nihsangaa sanga jaauunee ||

Ovee 184

परी असो कार्यापुरती । ऐकूनि घ्यावी येउती मात । श्रीगुरुमर्जी आली करतलांत । मारुं लाथ वैभवासी ॥

Transliteration

Paree aso kaaryaa-pura-tee | Aikuni ghyaavee yeutee maatu | Shree-Guru-marjee aalee karatala-antu | Maaru laatha vaibhavaasee ||

Ovee 185

ऐसें गोरक्ष कल्पूनि मनीं । येरीकडे मछिंद्रमुनी । कीलोतळेचे शब्द ऐकुनीं । आसनाहुनि ऊठिला ॥

Transliteration

Aise Goraksha kalpuni manee | Yereekade Machchindra-munee | Keelotaleche shabda aikunee | Aasanaahuni oothilaa ||

Ovee 186

अतिप्रेमा दाटूनि पोटीं । गोरक्षगळां घातली मिठी । करीं कमळूनि हृदयपोटीं । प्रेमें सद्गद आलिंगिला ॥

Transliteration

Ati-premaa daatuni potee | Goraksha-galaa ghaatalee mithee | Karee kamaluni hridaya-potee | Preme sadgada aalingilaa ||

Ovee 187

मग कलिंगेतें पाचारुन । अमूप द्रव्य दिधलें कीं वसन । गौरवूनि तियेचें मन । स्वस्थानातें बोळविलें ॥

Transliteration

Maga Kalingete paachaarunu | Amoopa dravya didhale kee vasanu | Gauravuni tiyeche manu | Svasthaanaate bolavile ||

Ovee 188

येरीकडे मंडपांत । शैल्यासहित मच्छिंद्रनाथ । निकट बैसवूनि गोरक्षातें । योगक्षेम पुसतसे ॥

Transliteration

Yereekade mandapaantu | Shailyaa-sahita Machchindra-Naathu | Nikat baisavuni Gorakshaate | Yogakshema pusatase ||

Ovee 189

बद्रिकाश्रमीं तपोराहाटी । तितुकें सांगे गोरक्षजेठी । कंटकाग्रीं पादांगुष्ठीं । द्वादश वर्षे संपादिली ॥

Transliteration

Badrikaa-ashramee tapo-raahaatee | Tituke saange Goraksha-jethee | Kantakaagree paadaan-gushthee | Dvaadasha varshe sampaadilee ||

Ovee 190

उपरी तप झालिया पूर्ण । माव करी उमारमण । सकळ देवां बोलावून । आतिथ्यही मिरवलें ॥

Transliteration

Uparee tapa jhaaliyaa poornu | Maava karee Umaaramanu | Sakala devaa bolaavunu | Aatithyahee miravale ||

Ovee 191

ऐसी झालिया तपराहाटी । परी तव वियोग साहिना पोटीं । क्षणक्षणां होऊनि कष्टी । शोक करुं रिघतसे ॥

Transliteration

Aisee jhaaliyaa taparaa-haatee | Paree Tav viyoga saahinaa potee | Kshana-kshanaa houni kashtee | Shoka karu righatase ||

Ovee 192

जया पदाचें होतां स्मरण । अंती जठर जाय वेष्टून । म्लानवदनीं ओस कानन । दाही दिशां दिसतसे ॥

Transliteration

Jayaa Padaache hotaa smaranu | Antee jathara jaaya veshtunu | Mlaana-vadanee osa kaananu | Daahee dishaa disatase ||

Ovee 193

मग उदकावांचूनि जैसा मीन । तडफडूनि देऊं पहात प्राण । तेवीं माझें अन्तःकरण । दुःखडोहीं हेलावे ॥

Transliteration

Maga udakaa-vaanchuni jaisaa meenu | Tadaphaduni deoo pahaata praanu | Tevee maajhe antahkaranu | Duhkhadohee helaave ||

Ovee 194

परी प्रारब्धयोग दारुण । येथें भेटले तुमचे चरण । आतां गेलिया प्राण । एकाकी कदा न वसें मी ॥

Transliteration

Paree praarabdha-yoga daarunu | Yethe bhetale Tumache charanu | Aataa geliyaa praanu | Ekaakee kadaa na vase mee ||

Ovee 195

ऐसें ऐकतां वचनयुक्तीं । पुन्हां धरीतसे हृदयाप्रती । म्हणे वत्सा तुज मागुती । एकांगें कदा न करी मी ॥

Transliteration

Aise aikataa vachana-yuktee | Punhaa dhareetase hridayaa-pratee | Mhane vatsaa tuja maagutee | Ekaange kadaa na karee mee ||

Ovee 196

मुळींहुनि बाळपण । तुवां न जाणिलें मजविण । सकळ करुनि लालन । स्थावरपणीं मिरविलें ॥

Transliteration

Muleenhuni baalapanu | Tuvaa na jaanile majavinu | Sakala karuni laalanu | Sthaavara-panee miravile ||

Ovee 197

जळावेगळी जळमासोळी । विभक्त न होय कवणे काळीं । तेवीं मम चित्तदरींत तपमौळी । विभक्त झाला नाहींस ॥

Transliteration

Jalaavegalee jalamaasolee | Vibhakta na hoya kavane kaalee | Tevee mama chitta-dareenta tapa-maulee | Vibhakta jhaalaa naaheensu ||

Ovee 198

परी न व्हावें तें घडूनि आलें । श्रीमारुतीनें मज गोंविलें । गौरविलें परी सदा फोलें । वैभव वाटे तुजविण बा ॥

Transliteration

Paree na vhaave tey ghaduni aale | Shree-Maaruteene maja govile | Gauravile paree sadaa phole | Vaibhava vaate tujavina baa ||

Ovee 199

बा भोजन करितां षड्रसान्नीं । तुझें स्मरण होतसे मनीं । बा तो ग्रास ठेवितां आननी । विशासमान वाटतसे ॥

Transliteration

Baa bhojana karitaan shadra-saannee | Tujhe smarana hotase manee | Baa toh graasa thevitaa aananee | Vishaasa-maana vaatatase ||

Ovee 200

मग अश्रूनें पूर्ण भरती नयन । तुजजवळी लागे माझा प्राण । मग मूर्तिमंत तूं जठरीं येऊन । उभा राहसी माझिया ॥

Transliteration

Maga ashruune poorna bharatee nayanu | Tujajavalee laage maajhaa praanu | Maga moortimanta too jatharee yeunu | Ubhaa raahasee maajhiyaa ||

Ovee 201

मग ताप उपजे मनांत । अहा बाळकासी टाकोनि वनांत । आलों मी फिरत फिरत । हेंचि चिंतन निशिदिनीं ॥

Transliteration

Maga taapa upaje manaantu | Ahaa baalakaasee taakoni vanaantu | Alo mee phirata phiratu | Henchi chintana nishidinee ||

Ovee 202

बा तुजविण करितां तीर्थभ्रमण । परी ओस दिशा बोभावे खिन्न मन । मनांत जल्पें वत्स टाकून । कैसा आलों मी पापी ॥

Transliteration

Baa tujavina karitaa teertha-bhramanu | Paree osa dishaa bobhaave khinna manu | Manaanta jalpe vatsa taakunu | Kaisaa aalo mee paapee ||

Ovee 203

ऐसें बोलता मात । मग बोलता झाला गोरक्षनाथ । हे महाराजा माझी ऐकें मात । तूतें सुत बहु असती ॥

Transliteration

Aise bolataa maatu | Maga bolataa jhaalaa Goraksha-Naathu | Hey Mahaaraajaa maajhee aike maatu | Toote suta bahu asatee ||

Ovee 204

जया देशीं कराल गमन । तेथेंचि सुत कराल निर्माण । मग तुमच्या मोहाचें आचरण । वांटले जाय महाराजा ॥

Transliteration

Jayaa deshee karaala gamanu | Tethenchi suta karaala nirmaanu | Maga tumachyaa mohaache aavaranu | Vaantale jaaya Mahaaraajaa ||

Ovee 205

परी एकचि तूं माझी आई । मन माझें एकेंचि ठायीं । मग जैसी होय गती पाहीं । जळाविण मीनांतें ॥

Transliteration

Paree ekachi too maajhee aaee | Mana maajhe ekenchi thaayee | Maga jaisee hoya gatee paahee | Jalaavina meenaante ||

Ovee 206

कीं अर्का कुमुदिनी असती अपार । तो मोह करील कोणावर । परी कुमुदा तो एकचि मित्र । सुखापारी आणाया ॥

Transliteration

Kee Arkaa kumudinee asatee apaaru | Toh moha kareela konaavaru | Paree kumudaa toh ekachi mitru | Sukhaa-paaree aanaayaa ||

Ovee 207

कीं चंद्रा चकोर असती बहुत । परी चकोरा एकचि रोहिणीनाथ । त्याचि न्यायें जननी मातें । अससी एकचि मातें तूं ॥

Transliteration

Kee chandraa chakora asatee bahutu | Paree chakoraa ekachi rohineenaathu | Tyaachi nyaaye jananee maate | Asasee ekachi maate too ||

Ovee 208

जळांत असती बहुत जळचर । परी जळचरा असतें एकचि नीर । तन्न्यायें मज माहेर । एकचि मछिंद्र आराधिला ॥

Transliteration

Jalaanta asatee bahuta jalacharu | Paree jalacharaa asate ekachi neeru | Tannyaaye maja maaheru | Ekachi Machchindra aaraadhilaa ||

Ovee 209

श्लाघ्य पुरुषा अन्य युवती । परी युवतीसी एकचि पती । तन्न्यायें कृपामूर्ती । माझें जीवन तूं अससी ॥

Transliteration

Shlaaghya purushaa anya yuvatee | Paree yuvateesee ekachi patee | Tannyaaye kripaa-moortee | Maajhe jeevana too asasee ||

Ovee 210

घनासी अपार असती चातक । परी चातकासी घन तो एक । तेवीं तूं मातें जननीजनक । एकचि अससी महाराजा ॥

Transliteration

Ghanaasee apaara asatee chaataku | Paree chaatakaasee ghana toh eku | Tevee too maate jananee-janaku | Ekachi asasee Mahaaraajaa ||

Ovee 211

ऐसें म्हणूनि गोरक्षनाथ । नेत्रीं आणी अश्रुपात । तें पाहूनि अंतरिक्षसुत । प्रेमें हृदयीं कळवळला ॥

Transliteration

Aise mhanuni Goraksha-Naathu | Netree aanee ashrupaatu | Tey pahuni Antariksha-sutu | Preme hridayee kalavalalaa ||

Ovee 212

म्हणे तान्हुल्या सत्य वचन । तुज कोणी नसे मजविण । ऐसें म्हणूनि मुखचुंबन । कुरवाळून धरीतसे ॥

Transliteration

Mhane taanhulyaa satya vachanu | Tuja konee nase majavinu | Aise mhanuni mukha-chumbanu | Kuravaaluna dhareetase ||

Ovee 213

मग सभास्थान विसर्जून । पाकशाळेंत उभयतां जाऊन । श्रीगोरक्षा ताटीं घेऊन । भोजनातें सारिलें ॥

Transliteration

Maga sabhaa-sthaana visarjunu | Paakashaalenta ubhayataa jaunu | Shree-Gorakshaa taatee gheunu | Bhojanaate saarile ||

Ovee 214

भोजन झालिया एकासनीं । निद्रा करिती उभय जणीं । दिनोदयीं स्नानें करोनी । एकासनीं बैसती ॥

Transliteration

Bhojana jhaaliyaa ekaasanee | Nidraa karitee ubhaya janee | Dinodayee snaane karonee | Ekaasanee baisatee ||

Ovee 215

एका अंकीं मीननाथ । एका अंकी गोरक्षसुत । कनकासनीं राजसभेंत । घेऊनि नाथ बैसती ॥

Transliteration

Ekaa ankee Meena-Naathu | Ekaa ankee Goraksha-sutu | Kanaka-aasanee raaja-sabhentu | Gheuni Naatha baisatee ||

Ovee 216

जैसा वक्रतुंड षडानन । घेऊनि बैसे उमारमण । कीं माय यशोदेजवळी राम कृष्ण । उभय अंकी मिरवती ॥

Transliteration

Jaisaa vakratunda shadaananu | Gheuni baise Umaa-ramanu | Kee Maya yashodejavalee Raama krishnu | Ubhaya ankee miravatee ||

Ovee 217

असो आतां हें कथन । पुढें सुखें झाले संपन्न । तें पुढिले अध्यायीं निरुपण । होईल श्रोतीं श्रवण कीजे ॥

Transliteration

Aso aataa hey kathanu | Pudhe sukhe jhaale sampannu | Tey pudhile adhyaayee nirupanu | Hoeela shrotee shravana keeje ||

Ovee 218

ते मछिंद्र उभय अंकीं । घेऊनि सुतसुताची फेडिल बाकी । शैल्यांनीं वेष्टुनि सुखासनीं हाटकीं । नित्य मिरवे मछिंद्र तो ॥

Transliteration

Tey Machchindra ubhaya ankee | Gheuni suta-suta-achee phedila baakee | Shailyaannee veshtuni sukhaasanee haatakee | Nitya mirave Machchindra toh ||

Ovee 219

नरहरिवंशीं धुंडीसुत । नरहरि मालू नाम ज्याते । तो श्रीगुरुकृपें रसाळ कथेतें । निवेदिल श्रोतियां ॥

Transliteration

Narahari-vamshee dhundee-sutu | Narahari Maaloo naama jyaate | Toh shree-gurukripe rasaala kathete | Nivedila shrotiyaa ||

Ovee 220

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । विंशतितमाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti shree-bhakti-kathaa-saaru | Sammata Goraksha-kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Vinshatitamaadhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu

Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार विंशतितमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Vimshatitama Sampurnah